!! हरे कृष्ण !!

# घरा मध्ये - पुजा करण्याचे नियम

* भगवंत हे आपल्या घराचे केंद्र अर्थात प्रमुख व्यक्ती आहेत.
* सर्व काही त्यांच्या प्रसन्नतेसाठी करीत आहोत  ही भावना ठेवावी.
* घरातील मुख्य खोलीमध्ये भगवंतांसाठी सुंदर मंदिर असावे.

* **मंदिरमध्ये खालील फोटो असावेत.**

१) राधा गोविंद

२) गौर निताई

३) पंचतत्व

४) नृसिंहदेव

५) तुलसी महाराणी

६) षड गोस्वामी

७) वैष्णव परंपरा

८) प्रभुपाद

९) दिक्षागुरू

* **पुजा पद्धती :**

१) प्रतीदिन पहाटे लवकर उठून भगवंतांची पूजा करावी.

२) दैनंदिन पुजेची एक वेळ निर्धारीत करावी.

३) भगवंतांसाठी वापरण्यात येणारी भांडी व वस्त्र स्वतंत्र ठेवण्यात यावीत.

४) पुजा प्रारंभ करतेवेळी सर्वप्रथम स्वच्छ पाणि आचमन पात्रात घेऊन त्यामध्ये काही थेंब गंगाजल टाकावे. ( गंगाजल बनविणे विधि ज्ञात असेल तर त्यानुसार गंगाजल बनवावे )

५) **आचमन करणे विधि** :

* सर्वप्रथम मांडी घालुन आसनावर बसावे.
* डाव्या हाताने आचमन पात्रातील पाणि उजव्या हाताच्या तळव्यावर घ्यावे. व असे तीन वेळा आचमनातील पाणि घेऊन ते प्राशन करीत खालील मंत्राचे उच्चारण करावे.

**१) ॐ केशवाय नम: ।**

**२) ॐ नारायणाय नम: ।**

**३) ॐ माधवाय नम: ।**

४) शेवटी तळहातावर पाणी घेऊन ते जमिनीवर सोडत **ॐ गोविंदाय नम: ।** असे म्हणावे.

---

---

# भगवंतांना उठविणे

१) रात्री भगवंतांना शयन ( विश्रांती ) दिलेली असते त्यामुळे पहाटे उठवताना देव्हाऱ्यातील लाईट लावून टाळी वाजवित हरे कृष्ण महामंत्र उच्चारण करावे.

२) भगवंत व आचार्य सर्व उठत आहेत या भावनेत, आडवे झोपविलेले सर्व फोटो उभे करून निर्धारीत जागेत ठेवावेत.

३) आचमन पात्रातील पाण्याने कपडा थोडा ओला करून सर्व फोटो ओल्या व सुक्या कपड्याने पुसून घ्यावेत.

४) फोटोंना हळदी, कुंकु, बुक्का, चंदन लावू नये.

५) हार असतील तर फोटोंना हार घालण्यात यावेत. हार नसतील तर भगवंत व आचार्यांच्या सर्व फोटोंना फुले वहावीत.

* खालील मंत्र उच्चारण करीत भगवंतांच्या चरणावर तुलसी अर्पण करावी.
* श्री कृष्ण :

**एतत् तुलसी पत्राणी श्री कृष्णाय नम: ।**

उच्चारण करीत श्री कृष्णांच्या दोन्ही चरणावरती तुलसी अर्पण करावी.

* श्री चैतन्य महाप्रभु :

**एतत् तुलसी पत्राणी श्री गौराय नम: ।**

उच्चारण करीत श्री चैतन्य महाप्रभुंच्या दोन्ही चरणावरती तुलसी अर्पण करावी.

* श्री नित्यानंद प्रभु :

**एतत् तुलसी पत्राणी श्री देवी जान्हवा वल्लभाय नम: ।**

उच्चारण करीत श्री नित्यानंद प्रभुंच्या दोन्ही चरणावर तुलसी अर्पण करावी.

* श्री अद्वैताचार्य :

**एतत् तुलसी पत्राणी श्री अद्वैताय नम: ।**

उच्चारण करीत श्री अद्वैताचार्यांच्या चरणावर तुलसी अर्पण करावी.

६) भगवंतांसमोर एक तेलाचा दिप प्रज्वलीत करून ठेवावा. ( तीळ / मोहरी तेल उत्तम )

७) त्यानंतर भगवंतांना पाण्याचे पेले भरून ठेवावेत.

---

---

# नैवेद्य दाखविणे पद्धती

• **नैवेद्य का दाखवावा ?**

आपण दैनंदिन जीवनात प्रत्येक कर्म करताना आपणाकडुन कळत-नकळत अनके प्रकारे पापकर्म होत असते. तसेच स्वयंपाक बनवितानाही अनेक प्रकारचे जीव-जंतू यांना इजा होते. या सर्व पापकर्मांच्या परिणामापासून वाचण्यासाठी आपण बनविलेला आहार भगवंतांना अर्पण करावा असे भगवान श्रीकृष्ण गीतेमध्ये खालील श्लोकामध्ये वर्णन करतात.

**यज्ञशिष्टाशिन: सन्तामुच्यन्ते सर्वकिल्बिषै: ।**
**भुज्जते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात् ।।**

भगवदभक्त हे सर्व प्रकारच्या पापांतून मुक्त होतात. कारण ते सर्वप्रथम यज्ञाला ( भगवान विष्णु / कृष्ण ) अर्पण केलेले अन्न ग्रहण करतात. इतर लोक जे स्वत:च्या इंद्रियभोगाकरीता भोजन बनवितात ते खरोखर केवळ पापच भक्षण करतात. ( भ.गीता - ३.१३ )

म्हणुन आपण जे काही दुध, फळे, शाकाहारी अन्नपदार्थ सेवन करू ते प्रथम भगवंतांना नैवेद्य अर्पण करूनच सेवन करावेत.

- **नैवेद्य दाखविण्याची पद्धत :**

१) भगवंतांसाठी स्वतंत्र - १ ताट, २/४ वाटी, १ पाणि ग्लास असावा त्यामधुनच नैवेद्य दाखवावा.

२) भगवंतांसाठी असलेल्या ताटामध्ये आपण खाऊ नये. आपण खाल्लेल्या ताटामध्ये भगवंतांना नैवेद्य दाखवू नये.

३) पदार्थ बनवताना त्याची चव घेऊ नये , सर्वप्रथम भगवंतांना नैवेद्य दाखवुनच इतरांनी त्याचे सेवन करावे.

४) निषिद्ध आहार ( मास ,अंडी ,मासे इ.)  भगवंतांना अर्पण करू नये.

५) जर आपल्या घरामध्ये कांदा-लसून विरहीत आहार बनत नसेल तर त्यातील कांदा-लसून विरहीत पदार्थांचा नैवेद्य दाखवावा. ( कांदा-लसून खाणे आध्यात्मिक प्रगती साठी हानिकारक आहे )

६) एका १६ वर्षाच्या युवकास किती भोजन लागते तेवढा नैवद्य ताटामध्ये भरून भगवंतांसमोर ठेवावे.

७) आचमन पात्रातील पवित्र जल हातावर घ्यावे व प्रत्येक पदार्थावर हलके शिंपडावे.

८) प्रत्येक पदार्थावर एक तुलसीपत्र ठेवावे.

९) घंटी वाजवीत खालील मंत्र उच्चारण करीत भगवंतांना नैवेद्य स्विकारण्यास प्रार्थना करावी.

- **नैवेद्य दाखविणे मंत्र :**

**नम: ॐ विष्णुपादाय कृष्णप्रेष्ठाय भूतले ।**
**श्रीमते भक्तिवेदान्त स्वामिन् इति नामिने ।।**
**नमस्ते सारस्वते देवे गौरवाणी प्रचारिणे ।**
**निर्विशेष शुन्यवादी पाश्चात्य देश तारिणे ।।**
**(३ वेळा)**

**नमो महावदान्याय कृष्णप्रेम प्रदायते ।**
**कृष्णाय कृष्णचैतन्यनाम्ने गौरत्विषे नम: ।।**
**(३ वेळा)**

**नमो ब्राह्मण्यदेवाय गोब्राह्मण हिताय च ।**
**जगत्हिताय कृष्णाय गोविंदाय नमो नम: ।।**
**(३ वेळा)**

**हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।**
**हरे राम हरे राम**
**राम राम हरे हरे ।।** **(३ वेळा)**

- **नैवेद्य काढणे :**

१० मिनिटे नैवेद्य ठेवल्यानंतर हाताची टाळी वाजवून नैवेद्य काढुन घ्यावा. सर्व पदार्थ मुख्य भांड्यामध्ये मिसळून घ्यावेत, भगवंतांची भांडी स्वतंत्र घासणीने धुवून ठेवावीत. नंतर आपण सर्वांनी आनंदाने महाप्रसाद प्रार्थना बोलून भगवद प्रसादाचे आस्वादन करावे.

नैवेद्य काढल्यानंतर

भगवंतांची आरती करावी.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------

# भगवंतांची आरती करणे

- **आरतीसाठी सामग्री :**

१) आचमन पात्र

२) घंटी

३) वाजविण्याचा शंख

४) आगपेटी

५) धूप व स्टँड

६) दिप ( एकदिप / पंचदिप )

७) अर्ध्य जल, पाण्यासाठी एक लोटा, अर्पण करण्यास छोटा शंख

८) वस्त्र ( रूमाल )

९) फुले,फुलासाठी लहान प्लेट

१०) चामर

११) मोरपंख

- **आरती प्रारंभ :**

प्रत्येक वस्तु अर्पण करताना आचमन पात्रातील गंगाजलाने प्रत्येक वस्तु शुद्ध करून घ्यावी.

१)प्रथम आचमन पात्रातील पाणि शंखावर सोडून शंख शुद्ध करावा.

२)३ वेळा दिर्घ शंख वादन करावे व पडदा उघडावा.

- **अर्पण करण्याचा क्रम :** प्रथम धूप, दिप, जल, वस्त्र, फुले, चामर, मोरपंख

• **वस्तु अर्पण करणे विधि :**

प्रत्येक वस्तू आपण प्रथम गुरूंना अर्पण करतो आणि गुरू त्या भगवंतांना अर्पण करतात. कोणतीही वस्तु अर्पण करताना आपण प्रथम गुरूची व आचार्यांची अनुमती घेतो आणि भगवंतांपासून आरतीस प्रारंभ करतो. म्हणुन सर्व वस्तु अर्पण करण्यापूर्वी प्रथम अनुमती घेण्याचा क्रम सर्व वस्तूंसाठी एकसारखाच आहे.

**अनुमती घेण्याचा क्रम :**

**१ .गुरूंना : ३ वेळ**

**२.प्रभुपाद : १ वेळ**

**३.नित्यानंद प्रभु : १ वेळ**

**४.चैतन्य महाप्रभु : ३ वेळ**

**५.राधाराणी : १ वेळ**

**६.कृष्णांपासून आरती प्रारंभ**

## • आरती प्रारंभ -

आरती खालील क्रमीक पद्धतीने अर्पण करावी व प्रत्येक वस्तु अर्पण करताना मंत्राचे उच्चारण करावे.

### १) धुप :

* श्री कृष्ण : **एष: धुप श्री कृष्णाय नम: ।** उच्चारण करीत सर्वांगास ७ वेळा ओवाळावी ( गोल फिरवावी )
* श्रीमती राधाराणी : **एष: धुप श्री राधिकायै स्वाहा ।** उच्चारण करीत सर्वांगास ७ वेळा ओवाळावी ( गोल फिरवावी )
* श्री चैतन्य महाप्रभु : **एष: धुप श्री गौराय नम: ।** उच्चारण करीत सर्वांगास ७ वेळा ओवाळावी ( गोल फिरवावी )

* श्री नित्यानंद प्रभु : **एष: धुप श्री देवी जान्हवा वल्लभाय स्वाहा ।** उच्चारण करीत - सर्वांगास ७ वेळा ओवाळावी ( गोल फिरवावी )
* श्री नृसिंहदेव : **एष: धुप श्री नृसिंहाय नम: ।** उच्चारण करीत - सर्वांगास ३ वेळा ओवाळावी ( गोल फिरवावी )
* श्रीमती तुलसी देवी : **एष: धुप श्री तुलस्यै नम: ।** उच्चारण करीत - सर्वांगास ३ वेळा ओवाळावी ( गोल फिरवावी)
* श्रील प्रभुपाद : **एष: धुप श्री परम गुरवे नम: ।** सर्वांगास ७ वेळा ओवाळावी ( गोल फिरवावी )
* श्री गुरूदेव : **एष: धुप श्री गुरवे नम: ।** सर्वांगास ७ वेळा ओवाळावी ( गोल फिरवावी )
* गर्भगृहासमोर - श्रील प्रभुपादांचा फोटो त्यास ३ वेळ ओवाळावी ( गोल फिरवावी )
* सर्व उपस्थित वैष्णवांना ३ वेळ ओवाळावी ( गोल फिरवावी )

## २) दिप :

* श्री कृष्ण : **एष: दिप श्री कृष्णाय नम: ।** चरणांस - ४ वेळ, नाभीस - २ वेळ, मुखकमलास - ३ वेळ व सर्वांगास ७ वेळा ओवाळावा ( गोल फिरवावी )
* श्रीमती राधाराणी : **एष: दिप श्री राधिकायै स्वाहा ।** चरणांस - ४ वेळ, नाभीस - २ वेळ, मुखकमलास - ३ वेळ व सर्वांगास ७ वेळा ओवाळावा ( गोल फिरवावी )
* श्री चैतन्य महाप्रभु : **एष: दिप श्री गौराय नम: ।** - चरणांस - ४ वेळ, नाभीस - २ वेळ, मुखकमलास - ३ वेळ व सर्वांगास ७ वेळा ओवाळावा ( गोल फिरवावी )

* श्री नित्यानंद प्रभु : **एष: दिप श्री देवी जान्हवा वल्लभाय नम: ।** - चरणांस - ४ वेळ, नाभीस - २ वेळ, मुखकमलास - ३ वेळ व सर्वांगास ७ वेळा ओवाळावा ( गोल फिरवावी )
* श्री नृसिंहदेव : **एष: दिप श्री नृसिंहाय नम: ।** - सर्वांगास ३ वेळा ओवाळावा ( गोल फिरवावी )
* श्रीमती तुलसी देवी : **एष: दिप श्री तुलसै नम: ।** - सर्वांगास ३ वेळा ओवाळावा ( गोल फिरवावी )
* श्रील प्रभुपाद : **एष: दिप परम गुरवे नम: ।** - चरणांस - ४ वेळ, नाभीस - २ वेळ, मुखकमलास - ३ वेळ व सर्वांगास ७ वेळा ओवाळावा ( गोल फिरवावी )
* श्री गुरूदेव : **एष: श्री गुरवे नम: ।** - चरणांस - ४ वेळ, नाभीस - २ वेळ, मुखकमलास - ३ वेळ व सर्वांगास ७ वेळा ओवाळावा ( गोल फिरवावी )
* गर्भगृहासमोर - श्रील प्रभुपादांचा फोटो त्यास ३ वेळ ओवाळावा ( गोल फिरवावी )
* सर्व उपस्थित वैष्णवांना ३ वेळ ओवाळावा ( गोल फिरवावी )

### ३) अर्ध्य ( जल ) :

* श्री कृष्ण : **इदं अर्ध्यं श्री कृष्णाय नम: ।** मुखकमलास ३ वेळ, सर्वांगास ७ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )
* श्रीमती राधाराणी : **इदं अर्ध्यं राधिकायै स्वाहा ।** मुखकमलास ३ वेळ, सर्वांगास ७ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )

* श्री चैतन्य महाप्रभु : **इदं अर्घ्यं श्री गौराय नम: ।**
मुखकमलास ३ वेळ, सर्वांगास ७ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )
* श्री नित्यानंद प्रभु : **इदं अर्घ्यं श्री देवी जान्हवा वल्लभाय नम: ।** मुखकमलास ३ वेळ, सर्वांगास ७ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )
* श्री नृसिंहदेव : **इदं अर्घ्यं श्री नृसिंहाय नम: ।**
सर्वांगास ३ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )
* श्रीमती तुलसी देवी : **इदं अर्घ्यं श्री तुलस्यै नम: ।**
सर्वांगास ३ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )
* श्रील प्रभुपाद : **इदं अर्घ्यं श्री परम गुरवे नम: ।**
मुखकमलास ३ वेळ, सर्वांगास ७ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )
* श्री गुरूदेव : **इदं अर्घ्यं श्री गुरवे नम: ।**
मुखकमलास ३ वेळ, सर्वांगास ७ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )
* गर्भगृहासमोर - श्रील प्रभुपादांचा फोटो
त्यास ३ वेळ ओवाळावे ( गोल फिरवावे )
* सर्व उपस्थित वैष्णवांना
३ वेळ ओवाळावे ( गोल फिरवावे )

## ४) वस्त्र :

* श्री कृष्ण : **इदं वस्त्रं श्री कृष्णाय नम: ।**
सर्वांगास ७ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )
* श्रीमती राधाराणी : **इदं वस्त्रं श्री राधिकायै स्वाहा ।**
सर्वांगास ७ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )

* श्री चैतन्य महाप्रभु : **इदं वस्त्रं श्री गौराय नम: ।** सर्वांगास ७ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )
* श्री नित्यानंद प्रभु : **इदं वस्त्रं श्री देवी जान्हवा वल्लभाय नम: ।** सर्वांगास ७ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )
* श्री नृसिंहदेव : **इदं वस्त्रं श्री नृसिंहाय नम: ।** सर्वांगास ३ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )
* श्रीमती तुलसी देवी : **इदं वस्त्रं श्री तुलस्यै नम: ।** सर्वांगास ३ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )
* श्रील प्रभुपाद : **इदं वस्त्रं श्री परम गुरवे नम: ।** सर्वांगास ७ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )
* श्री गुरूदेव : **इदं वस्त्रं श्री गुरवे नम: ।** सर्वांगास ७ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )
* गर्भगृहासमोर - श्रील प्रभुपादांचा फोटो त्यास ३ वेळ ओवाळावे ( गोल फिरवावे )
* सर्व उपस्थित वैष्णवांना ३ वेळ ओवाळावे ( गोल फिरवावे )

**५) पुष्प :**

* श्री कृष्ण : **एतानी पुष्पानी श्री कृष्णाय नम: ।** सर्वांगास ७ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे)
* श्रीमती राधाराणी : **एतानी पुष्पानी श्री राम राधिकायै स्वाहा ।** सर्वांगास ७ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )
* श्री चैतन्य महाप्रभु : **एतानी पुष्पानी श्री गौराय नम: ।** सर्वांगास ७ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )

* श्री नित्यानंद प्रभु : **एतानी पुष्पानी श्री देवी जान्हवा वल्लभाय नम: ।** सर्वांगास ७ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )
* श्री नृसिंहदेव : **एतानी पुष्पानी श्री नृसिंहाय नम: ।** सर्वांगास ३ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )
नंतर वरील सर्वांना फुले वाहने
* श्रीमती तुलसी देवी : **एतानी पुष्पानी श्री तुलस्यै नम: ।** सर्वांगास ३ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )
* श्रील प्रभुपाद : **एतानी पुष्पानी श्री परम गुरवे नम: ।** सर्वांगास ७ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )
* श्री गुरूदेव : **एतानी पुष्पानी श्री गुरवे नम: ।** सर्वांगास ७ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावे )
नंतर उरलेल्या सर्वांना फुले वाहने
* गर्भगृहासमोर - श्रील प्रभुपादांचा फोटो
त्यास ३ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावी )
* सर्व उपस्थित वैष्णवांना
३ वेळा ओवाळावे ( गोल फिरवावी )

**६) चामर :**

* श्री कृष्ण : **एष: चामर श्री कृष्णाय नम: ।** सर्वांगास ७ वेळा अर्पण करावे
* श्रीमती राधाराणी : **एष: चामर श्री राधिकायै स्वाहा ।** सर्वांगास ७ वेळा अर्पण करावे
* श्री चैतन्य महाप्रभु : **एष: चामर श्री गौराय नम: ।** सर्वांगास ७ वेळा अर्पण करावे
* श्री नित्यानंद प्रभु : **एष: चामर श्री देवी जान्हवा वल्लभाय नम: ।** सर्वांगास ७ वेळा अर्पण करावे

* श्री नृसिंहदेव : **एष: चामर श्री नृसिंहाय नम: ।** सर्वांगास ३ वेळा अर्पण करावे
* श्रीमती तुलसी देवी : **एष: चामर श्री तुलस्यै नम: ।** सर्वांगास ३ वेळा अर्पण करावे
* श्रील प्रभुपाद : **एष: चामर श्री परम गुरवे नम: ।** सर्वांगास ७ वेळा अर्पण करावे
* श्री गुरूदेव : **एष: चामर श्री गुरवे नम: ।** सर्वांगास ७ वेळा अर्पण करावे
* गर्भगृहासमोर - श्रील प्रभुपादांचा फोटो त्यास ३ वेळा अर्पण करावे
* सर्व उपस्थित वैष्णवांना ३ वेळा अर्पण करावे

**७) मोरपंख :**

* श्री कृष्ण : **एष: व्यंजन सेवा श्री कृष्णाय नम: ।** सर्वांगास ७ वेळा अर्पण करावे
* श्रीमती राधाराणी : **एष: व्यंजन सेवा राधिकायै स्वाहा ।** सर्वांगास ७ वेळा अर्पण करावे
* श्री चैतन्य महाप्रभु : **एष: व्यंजन सेवा श्री गौराय नम: ।** सर्वांगास ७ वेळा अर्पण करावे
* श्री नित्यानंद प्रभु : **एष: व्यंजन सेवा श्री देवी जान्हवा वल्लभाय नम: ।** सर्वांगास ७ वेळा अर्पण करावे
* श्री नृसिंहदेव : **एष: व्यंजन सेवा श्री नृसिंहाय नम: ।** सर्वांगास ३ वेळा अर्पण करावे
* श्रीमती तुलसी देवी : **एष: व्यंजन सेवा श्री तुलस्यै नम: ।** सर्वांगास ३ वेळा अर्पण करावे

* श्रील प्रभुपाद : **एष: व्यंजन सेवा श्री परम गुरवे नम: ।** सर्वांगास ७ वेळा अर्पण करावे
* श्री गुरूदेव : **एष: व्यंजन सेवा श्री गुरवे नम: ।** सर्वांगास ७ वेळा अर्पण करावे
* गर्भगृहासमोर - श्रील प्रभुपादांचा फोटो त्यास ३ वेळ अर्पण करावे.
* सर्व उपस्थित वैष्णवांना ३ वेळ अर्पण करावे.

♦ हे सर्व अर्पण केल्यानंतर ३ वेळा दिर्घशंख वाजवून आरतीची सांगता करावी.

♦ आरतीमध्ये अर्पण केलेले अर्ध्य उपस्थित सर्वांच्या अंगावर हलकेसे शिंपडावे.

♦ अर्पण केलेले पुष्प इतरांना महाप्रसाद म्हणुन द्यावेत.

♦ भगवंतांना साष्टांग दंडवत प्रणाम अर्पण करावा.

❖ **<u>टिप :</u> जर कोणास प्रतीदिवस सकाळ संध्याकाळी पुर्ण आरती करणे शक्य नसेल तर काय करावे ?**

१) घरातील कोणीही व्यक्ती आरती करू शकत असेल तर दोन्ही वेळी पुर्ण आरती करावी. ( माताजी / प्रभुजी / प्रशिक्षित मुले कोणीही करू शकतात )

२) दोन्ही वेळ पुर्ण आरती शक्य नसेल तर एक वेळ पुर्ण आरती करावी.

३) एक वेळीही पुर्ण आरती शक्य नसेल तर छोटी आरती करावी

४) छोटी आरती मध्ये अर्पण करावयाच्या वस्तु - **धुप, पुष्प, चामर, मोरपंख**

५) आठवड्यातून एक दिवस तसेच एकादशी व उत्सवास पुर्ण आरती करावी.

- विधिमध्ये काही चुका / त्रुटी होतात म्हणुन भगवंतांना त्यासाठी क्षमायाचना करून कृपेची याचना करावी.
- हरे कृष्ण महामंत्र यथासंभव अधिक नामस्मरण करावे.
- प्रतीदिन भगवदगीता किंवा भागवत 5 श्लोक वाचन करावे.

---

## भगवंतांना झोपविणे ( विश्रांती देणे )

१) भगवंतांना रोज रात्री ९ वा. विश्रांती द्यावी.

२) दुपारी साधारण १ वा. विश्रांती द्यावी. ( दुपारी केवळ पडदा बंद करावा )

३) रात्री भगवंतांच्या चरणाची तुलसी, हार व देव्हाऱ्यातील सर्व फुले काढुन निर्माल्यात सोडून द्यावीत.

४) भगवंतांना विश्रांती घेण्यास विनंती करावी. जर देव्हाऱ्यात जागा असेल तर फोटो आडवे झोपवून त्यावर वस्त्र पांघरावे. अन्यथा मानसिक प्रार्थना अर्पण करून विश्रांती देण्यात यावी.

५) देव्हाऱ्यातील लाईट बंद करून पडदा बंद करावा आणि भगवंतांना दंडवत प्रणाम अर्पण करावा.

---

- **प्रसाद घेण्यापुर्वी म्हणावयाची प्रार्थना :**

महाप्रसादे गोविन्दे, नाम-ब्रह्मणि वैष्णवे ।
स्वल्पपुण्यवतां राजन् विश्वासो नैव जायते ।। १ ।।

शरीर अविद्या जाल, जडेन्द्रिय ताहे काल, जीव फैले विषय-सागरे ।
तार मध्ये जिव्हा अति, लोभमय सुदुर्मति, ताके जेता कठिन संसारे ।। २ ।।

कृष्ण बड दयमय, करिवारे जिव्हा जय, स्वप्रसाद-अन्न दिला भाई ।
सेई अन्नामृत पाओ, राधाकृष्ण-गुण गाओ, प्रेमेडाक चैतन्य निताई ।। ३ ।।

जय श्रीकृष्ण चैतन्य प्रभु नित्यानंद ।
श्रीअद्वैत गदाधर श्रीवासादि गौर भक्तवृंद ।।

हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।
हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।।

एकादशी दिवशी वरील पैकी केवळ पहिला मंत्र म्हणावा.

**धन्यवाद !!!**